# नियमित दिवाणी मुकदमा क्र. १०३/२००५ निशाणी क्र.६९ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करू नये अशी तुर्तातूर्त ताकिद मिळविझयाकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार वादीच्या वकीलांच्या गैरहजेरीचा फायदा घेवून पी.डब्ल्यू.डी. मार्फत झालेल्या शिरवळ—लोणंद रस्त्याच्या चौपदरीकरणाकामी वादीच्या कब्जेवहिवाटीतील जमिनीचा दस्त प्रतिवादी क्र. १ व २ हे या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यास त्यांच्या नावाची नोंद असल्याने करून देणार असून असे घडल्यास वादीचे फार मोठे नुकसान होणार असल्याने दाखल केलेला आहे.

३. नि. ७१ वर प्रतिवादी क्र. १ ने नि. ६९ ला आपले म्हणणे सादर करून अर्जास आव्हानित केलेले आहे. त्यांच्या कथनानुसार दिनांक २४/८/२००५ रोजीचे प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यातील खरेदीखत बेकायदेशीर असल्याचा जाहिर ठराव करून मागण्याकरीता हा दावा केलेला आहे. परंतु, वादीने हा दस्त रद्द करून मागितलेला नाही व प्रस्तुत अर्जात कोणताही स्पष्ट उल्लेख केलेला नाही. शिरवळ—लोंणद रस्त्याचे चौपदरीकरण शासनामार्फत झालेले असून शासन भूसंपादन कार्यवाही बेकायदेशीररित्या करत नाही. तसेच वादीने प्रस्तुत अर्जात मिळकतीचा कोणताही गट नंबर अथवा सर्व्हे नंबर याचा उल्लेख केलेला नाही. वादीचे कोणत्या स्वरूपात नुकसान होणार आहे याचा उल्लेख केलेला नाही. तसेच वादीची प्रत्यक्ष वहिवाट असल्याचा पुरावा त्याने दाखल केलेला नाही. वादीचा दावा वाद मिळकत गहाण ठेवल्याबाबत असून त्यामुळे वादीस कोणतीही मालकी येवू शकत नाही. अशा परिस्थितीत वादीस शासनाचे संपादन प्रक्रियेस हरकत करावयाची

असल्यास त्याने शासनाविरूद्ध दावा करण्याचे जरूरीचे असल्याने प्रस्तुतचा अर्ज नुकसान भरपाईसहित फेटाळण्यात यावा अशी विनंती करण्यात आलेली आहे.

४. उभयपक्षांची कथने, परिस्थिती व युक्तीवाद विचारात घेता पुढीलप्रमाणे मुद्दे न्यायालयाचे विचाराधीन असून त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे निघतात.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी प्रथमदर्शनी बाजू सिद्ध करतो काय ? | नकारार्थी |
| २) | वादीचा अर्ज नामंजूर केल्यास वादीस अपरिमित हानी संभवते काय ? | नकारार्थी |
| ३) | न्यायाचा तौलनिक तराजू वादीच्या पक्षात झुकतो ? | नकारार्थी |
| ४) | अंतिम आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

### सर्व मुद्दे एकत्रितरित्या :

५. प्रस्तुत अर्जाचे स्वरूप लक्षात घेता वादीने प्रतिवादींविरूद्ध तुर्तातूर्त ताकिदीचा हुकूम मागितला आहे. परंतु हा हुकूम मागताना वादीने अर्जामध्ये केलेली कथने मोघम व वरवरची आहेत. कोणत्या मिळकती रस्त्याच्या चौपदरीकरणात जात आहेत , यासंदर्भात वादीने कोणताही खुलासा केलेला नाही. त्याचप्रमाणे प्रस्तुत मिळकती आजमितीस वादीच्या कब्जेवहिवाटीत असल्याचा कोणताही पुरावा वादीने सादर केलेला नाही. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ हे जमिनीचा दस्त कोणास करून देणार आहेत व त्यासंदर्भात त्यांनी कोणती उपाययोजना केलेली आहे यासंदर्भातही कोणताही खुलासा वादीने केलेला नाही. अशा परिस्थितीत एकंदरीत शिरवळ—लोणंद

रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम हे शासनामार्फत करण्यात येत असल्याने भूसंपादनाची कार्यवाही ही स्वतंत्र प्रक्रिया असून त्या संदर्भातील आक्षेप भूसंपादन अधिकाऱ्यांकडे नोंदविता येणे शक्य आहे. अर्जाचे स्वरूप व रचना लक्षात घेता अर्ज मोघम स्वरूपाचा असल्याने केवळ त्यावर आधारून कोणतीही ताकीद देणे न्यायोचित होऊ शकत नाही. एकंदरीत वादीने प्रथमदर्शनी बाजू सिद्ध केलेली नाही. सद्य परिस्थितीत न्यायाचा तौलनिक तराजू त्यांच्या पक्षात झुकत नाही व कोणतीही अपरिमित हानी आजमितीस त्यास संभवत असल्याची कोणतीही परिस्थिती निदर्शनास येत नसल्याने या सर्व कारणास्वत सर्व मुद्दयांचे निष्कर्ष वादीचे पक्षात नकारार्थी निघतात व वादीचा अर्ज फेटाळण्यात येतो. पुढीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येतात.

## आदेश

अर्ज फेटाळण्यात येतो.

(रू. उ. मालवणकर)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर,खंडाळा.

दिनांक : ०५/०५/२०१२
खंडाळा.